# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/01/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अपहरण केलेल्या अल्पवयीन मुलीची १०४ दिवसांनी सुटका करुन आरोपीस केले जेरबंद

## (स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई)

दि. २७/०९/२०२२ रोजी पांढरढाकणी तह. नरखेड येथून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला जामगांव येथे रहाणारा मनिष मनकवडे याने अपहरण करुन नेल्याबाबत तक्रार पोलीस ठाणे जलालखेडा येथे प्राप्त झाली. प्राप्त तक्रारीची दखल घेवून आरोपीविरुध्द कलम ३६३ भादवि अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचा तपास जलालखेडा पोलीसांनी सुरु केला व पिडीत अपहृत मुलीचा व आरोपीचा शोध घेण्यात सुरवात केली. परंतु आरोपी व पिडीत मुलगी मिळून आली नाही. या प्रकरणात नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक यांनी श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करुन पिडीत मुलीचा शोध घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सदर प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरु केला. तपासा दरम्यान आरोपी हा पिडीत मुलीला घेवून अमरावती येथे गेल्याची माहिती प्राप्त झाली. परंतु आरोपी हा आपले वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलत असल्याने आरोपीचे ठावठिकाणाची निश्चीत माहिती मिळून येत नव्हती. अश्यातच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दि. ०८/०१/२०२३ रोजी खात्रीशिर माहिती मिळाली की, आरोपी हा पिडीत मुलीसोबत कळमेश्वर येथील ब्राम्हणी या परिसरात लपला आहे. कळमेश्वर परिसरातील ब्राम्हणी, गोतमारे ले—आउट, कांचनगंगा ले—आउट परिसरात सुमारे २०० पेक्षा अधीक निवासस्थानी आरोपीचा शोध घेतला तेव्हा पिडीत मुलगी ही श्री राज पाटील, यांचे निवासस्थान वार्ड नं. ६, संजीवनी हॉस्पीटल कळमेश्वर येथे मिळून आली. परंतु आरोपी हा कामानिमीत्त बाहेर असल्याने आरोपी मिळून आला नाही. यादरम्यान आरोपीस पोलीस त्याला शोधत असल्याची सुचना मिळाल्याने आरोपी पळून गेला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कळमेश्वर हद्दीत आरोपीचा शोध घेतला व आरोपी मनिष बाबाराव मनकवडे, वय २९ वर्ष, रा. जामगांव (बु.) तह. नरखेड जि. नागपूर याला दहेगांव येथुन ताब्यात घेतले. सुमारे १०४ दिवसांनी या प्रकरणाचा उलगडा करुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पिडीत अल्पवयीन अपहृत मुलीची सुटका करुन तिला तिचे पालकांचे स्वाधीन केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले, यांचे मार्गदर्शनात श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक, सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिष ठाकुर, सहा. फौजदार श्री चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, निलेश बर्वे, पोलीस नायक सतिष राठोड आणि महीला पोलीस शिपाई स्वाती हिंडोरीया, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे पथकाने पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर